[इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीमध्ये अनुवाद]

अनुसूचित जाती उद्धार संघ व इतर

विरुद्ध

भारतीय संघराज्य आणि इतर

एप्रिल २०, १९९५

[न्या. आर. एम. सहाय आणि न्या. बी. एल. हंसारिया]

सेवा नियम :

संरक्षण गुणवत्ता हमी नियम, 1979 :

नियम ८ – परिशिष्ट I.

कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी- वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून पदोन्नती -नियमांमध्ये दुरुस्ती - पदोन्नतीसाठी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून तीन वर्षे सेवा आणि अभियांत्रिकीची पदवी निश्चित करणाऱ्या सुधारित नियमांमध्ये दुरुस्ती - कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून नामिकाप्रविष्ट असलेल्या परंतु नियम दुरुस्तीच्या तारखेस कोणत्याही अटींची पूर्तता न करणाऱ्या व्यक्तींनी नियमांना आव्हान दिले- असा निर्णय दिला की, अशा व्यक्ती नियमांनी बाधित झाल्या नाहीत.

केवळ पदविका अर्हता असलेल्या याचिकाकर्त्यांना कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून पदोन्नतीसाठी नामिकाप्रविष्ट करण्यात आले होते. त्यानंतर सेवा नियम म्हणजे संरक्षण गुणवत्ता हमी नियम, १९७९ मध्ये दुरुस्ती करण्यात आली आणि कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी (पदोन्नत) यांनी तीन वर्षे नियमित सेवेत राहिल्यास आणि अभियांत्रिकीची पदवी घेतल्यासच पदोन्नती मिळू

शकते, असे विहित करण्यात आले. याचिकाकर्त्यांनी सुधारित नियमांना आव्हान देणारी रिट याचिका या न्यायालयात दाखल केली होती ज्यात असा युक्तिवाद करण्यात आला होता की (१) पदवीची अट थेट नियुक्त्यांसाठी लागू आहे आणि पदोन्नतसाठी नाही (२) एकदा का पदविकाधारकाची कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून निवड झाली की त्याच्या पदोन्नतीच्या उद्देशाने उच्च पात्रतेचे पात्रता निकष लागू केले जाऊ शकत नाहीत; आणि (iii) याचिकाकर्त्यांनी बराच काळ काम केलेले याचिकाकर्ते अनुभवाच्या आधारे पदोन्नतीस पात्र होते आणि म्हणूनच पदवीची अट पाळली जाऊ नये.

याचिका फेटाळत या न्यायालयाने,

असा निर्णय दिला की : १ सुधारित नियमांनुसार विहित पात्रतेच्या निकषांची पूर्तता केल्याशिवाय कोणालाही पदोन्नती देता येत नाही. यात शंका नाही की, पूर्वीच्या नियमांच्या आधारे याचिकाकर्त्यांना कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदावर पदोन्नत करण्यासाठी त्यांची निवड करण्यात आली, परंतु यामुळे त्यांना उच्च पदासाठी विचार करण्याचा कोणताही अधिकार त्यांच्यावर प्रदान केलेला नाही. ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी नव्हते. तसेच त्यांनी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून त्यांनी कोणताही अनुभवही मिळवला नव्हता. केवळ कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून नियुक्त होण्याच्या पात्रतेमुळे ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी बनले नाहीत. याचिकाकर्ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम करीत नसल्याने त्यांनी तीन वर्षांची नियमित सेवा केली असे म्हणता येणार नाही. शिवाय ते केवळ पदविकाधारक आहेत. त्यामुळे, पात्रतेचा एकही निकष पूर्ण झाला नाही. ज्या दिवशी नियम लागू झाले त्या तारखेस ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारीदेखील नव्हते म्हणून ते नियमामुळे बाधित झाल्याचा दावा यशस्वीपणे करू शकत नाहीत. [637-डी ते एफ]

२. असे निवेदन की, वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी श्रेणी-२ या पदावर नियुक्तीसाठी पदवी असणे आवश्यक आहे, पदोन्नतीसाठी नव्हे तर थेट नेमणुकांना लागू होते, ते १९७९ च्या नियमावली परिशिष्ट १ मध्ये करण्यात आलेला नाही. [637.एफ1]

३. नामिकाप्रविष्ट करण्यात आलेल्या याचिकाकर्त्यांनाही नियमितपणे काम करणाऱ्यांप्रमाणेच लाभ देण्यात यावा, हे निवेदन ग्राह्य धरला जाऊ शकत नाही, कारण जे नामिकाप्रविष्ट मध्ये समाविष्ट होते त्यांना कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदावर कार्यरत असलेल्यांप्रमाणे वागणूक देता येत नाही. [637.एच, 638-ए]

दिवाणी मूळ अधिकार क्षेत्र : रिट याचिका (दि) क्रमांक ३९०/१९९५.

(भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत)

याचिकाकर्त्यांसाठी - डी. गोवर्धन.

उत्तरवादींसाठी - एन. एन. गोस्वामी, टी. सी. शर्मा, कु. अनिल कटियार, कु. निलम आणि कु. ए. सुभाषिनी.

न्यायालयाचा आदेश पुढीलप्रमाणे पारित करण्यात आला :

याचिकाकर्ता हे गुणवत्ता हमीचे महासंचालनाल यांचे अंतर्गत कार्यरत होते आणि याचिका दाखल झाल्याच्या तारखेस ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी वर्ग-२ या पदावर कार्यरत होते, त्यांनी असे निर्देश देण्याची मागणी केली की, नियमांमधील दुरुस्ती जे विहित करते की, वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी - II हे पद धारण करण्यासाठी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी (पदोन्नत) याकडे पद्वयुत्तर पदवी असणे आवश्यक आहे, ही तरतूद अधिकारबाह्य घोषित केली जावे. पर्यायात असा दावा केला जातो की, याचिकाकर्त्यांना कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी ग्रेड-II म्हणून नामिकाप्रविष्ट करण्यात आले असल्याने, त्यांना सरकारने तयार केलेल्या नियमांनुसार समान लाभ मिळण्याचा हक्क आहे, जो वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी ग्रेड-II या पदावर कार्यरत असलेल्या पदोन्नत यांना देण्यात आला होता.

संरक्षण मंत्रालयाने तयार केलेले संबंधित नियम संरक्षण गुणवत्ता हमी नियम, 1979 म्हणून ओळखले जातात, ज्यामधील नियम ८ मध्ये अशी तरतुद करण्यात आली आहे की, वरिष्ठ वैज्ञानिक अधिकाऱ्यांची ५० टक्के पदे कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी श्रेणीतून गुणवत्तेच्या आधारे निवड होवून पदोन्नतीने भरण्यात येतील. पदांची संख्या, पदनाम, वेतन आणि पात्रता याबाबत

परिशिष्ट I मध्ये तरतूद करण्यात आली आहे. वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी श्रेणी- II यांचे पद अनुक्रमांक ६ वर नमूद करण्यात आले आहे. नोंद खालीलप्रमाणे उद्धृत केली आहे :

| अनु. क्र. | पदनाम | वेतन श्रेणी | पदांची संख्या | ज्या श्रेणीमधून पदोन्नती अनुज्ञेय आहे आणि किमान पात्रता कालावधी विहित आहे |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |
| 6. | वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी श्रेणी- II | रु. ७००-४०-९०० ईबी-४०-११००-५०-१३०० | २०० | कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या श्रेणीमध्ये 3 वर्षांची नियमित सेवा आणि अभियांत्रिकी/ विज्ञानातील पदव्युत्तर पदवी किंवा समकक्ष अर्हता. शैक्षणिक अहर्ता बाबतचे हे नियम लागू होण्याच्या तारखेपासून नियमितपणे कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदावर असलेल्यांना शैक्षणिक पात्रतेची अट लागू होणार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | नाही. |

अशाप्रकारे कनिष्ठ वैज्ञानिक अधिकाऱ्याने तीन वर्षे नियमित सेवा केली असेल आणि अभियांत्रिकीची पदवी घेतली असेल तरच त्याला वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून बढती दिली जाऊ शकते. याचिकाकर्त्यांनी एकही अट पूर्ण केली नाही. ज्या तारखेला हे नियम लागू करण्यात आले त्या तारखेला ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम करत नव्हते. ते केवळ पदविकाधारक होते. याचिकाकर्त्यांच्या असे मांडण्यात आले की, पदवी असणे आवश्यक आहे ही अहर्ता थेट नियुक्तीद्वारे असलेल्यांसाठी आहे पदोन्नतसाठी नव्हे. पुढे, याचिकाकर्त्यांच्या वकीलाने जोरदारपणे असे सादर करण्यात आले की, पदविकाधारक व्यक्तीची कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून निवड झाली की वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी पदावर पदोन्नतीच्या उद्देशाने त्याला उच्च पात्रतेचे निकष लागू करता येणार नाहीत. याचिकाकर्त्यांनी दीर्घकाळ काम केले असून त्यांना त्यांच्या अनुभवाच्या आधारे पदोन्नती देण्यात यावी, अशी विनंती ही विद्वान वकिलांनी केली. तसेच, पदवीची अट पाळता कामा नये. सप्टेंबर १९७९ मध्ये हे नियम लागू झाले. नियमांच्या परिशिष्ट १ अंतर्गत वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी ग्रेड II साठी फीडर पद कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी आहे, त्यामुळे, नियमात नमूद केलेल्या पात्रतेच्या निकषांची पूर्तता केल्याशिवाय कोणालाही पदोन्नती देता येणार नाही. कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदावर पदोन्नती मिळण्यासाठी याचिकाकर्त्यांना पूर्वीच्या नियमांमध्ये नामिकाप्रविष्ट करण्यात आले होते, यात शंका नाही, परंतु यामुळे त्यांना उच्च पदासाठी विचार करण्याचा कोणताही अधिकार प्रदान झालेला नाही. ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी नव्हते. कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारीचा अनुभवही त्यांनी मिळवला नव्हता. केवळ कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून नियुक्त होण्याच्या पात्रतेमुळे ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी बनले नाहीत. याचिकाकर्ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी म्हणून काम करीत नसल्याने त्यांनी तीन वर्षांची नियमित सेवा केली असे म्हणता येणार नाही. शिवाय ते केवळ पदविकाधारक आहेत. पात्रतेचा एकही निकष पूर्ण केला नव्हता. ज्या दिवशी नियम लागू झाले त्या तारखेस ते कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारीदेखील नव्हते म्हणून ते नियमामुळे बाधित झाल्याचा दावा यशस्वीपणे

करू शकत नाहीत. तसेच वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी श्रेणी-II या पदावर नियुक्तीसाठी पदवी असणे आवश्यक आहे तसेच ही बाब पदोन्नतसाठी नव्हे तर थेट नेमणुकांना लागू होते ही 1979 नियमाच्या परिशिष्ट I मधील तरतुद द्वारे हे केले गेले नाही. ही तरतूद दोन भागांमध्ये करून वाचली जावी आणि सरळ भरतीसाठी पदोन्नती व अभियांत्रिकीसाठी तीन वर्षांची अट घ्यावी, ह्या विद्वान वकिलांनी केलेल्या युक्तिवादात काही तथ्य नाही.

विद्वान वकिलांचा युक्तिवाद की, याचिकाकर्ते जे नामिकेमध्ये समाविष्ट होते त्यांना देखील जे नियमित तत्वावर काम करीत आहेत त्यांच्याप्रमाणेच लाभ देण्यात यावे हा मंजूर करता येत नाही कारण जे नामिकेमध्ये प्रविष्ट आहेत त्यांना जे कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी या पदावर काम करत आहेत आणि ते पद धारण केले आहे त्यांच्याप्रमाणे मानले जाऊ शकत नाही.

परिणामी, ही याचिका अयशस्वी ठरते आणि फेटाळली जाते.

टी.एन.ए. याचिका फेटाळली.

**x-x-x-x-x-x**

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x-x-x**